### प्रास्तावना

# आपला माणूस - आपला किरीट

आपली कामे आपला माणूसच करतो हा आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या किरीट सोमैयांनी समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कल्पकतेचा ठसा उमटवला.

आरोग्य क्रिडा-प्रवास निवास, शिक्षक-शिक्षण, निरोगी बालपण, पर्यावरण मलनिस्सारण, नागरिकांच्या हिताचे रक्षण, आर्थिक विषय, सामाजिक उत्सव, राष्ट्रीय आशय अशा प्रत्येक विषयात लक्ष घालणारा एकमेव लोकप्रतिनिधी.

ज्या ज्या माध्यमातून मतदारांना सोयीसुविधा मिळवून देता येतील त्या त्या माध्यमांचा त्यांनी यशस्वीपणे उपयोग केला. मतदारांना दिलासा दिला आणि म्हणूनच हा उच्चांक निर्माण केला.

त्यांनी केलेल्या कामाचा धावता आढावा घ्यायचा म्हटला तरी त्याची यादी खूप मोठी होईल. म्हणूनच एकेका कामातून अनेकांना लाभ मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न सर्वस्वी आगळावेगळा म्हणावा लागेल. लोकसभेतील चर्चा प्रश्नोत्तरे खासदारांनी वेगवेगळ्या योजनांसाठी अर्थसंकल्पातील तरतूदीचा वापर अशा अनेक मार्गांतून-माध्यमातून त्यांनी अनेक कामे केली आहेत.

समाज कार्याची मुळातच आवड असल्यामुळे किरीट सोमैया यांनी आपल्या मतदार संघाबरोबर मुंबईकरांचे अनेक प्रश्न तडीस नेले आहेत. लोकांच्या कामासाठी सतत लोकांमध्ये वावरणारा, उपक्रमांमधून स्नेह



वाढविणारा, मतदारांना आपला वाटणारा आपला माणूस अशीच त्यांची ओळख झाली आहे. अनेक कांमामधून कामांचे गुणात्मक मुल्य आणि असंख्य कामे केल्यामुळे त्यांचे संख्यात्मक मुल्य किती मोठे आहे हेही सहज लक्षात येते.

आरोग्य,निवारा, रेल प्रवास, पर्यावरण, पुनर्वसन, शौचालय, छोटया गुंतवणूकदारांची सुरक्षा, केबल, विक्रांत बचाव अभियान, वाहतुक समस्या, वृक्षारोपण, गरजूंना महागडया शस्त्रक्रियांसाठी आर्थिक मदत, पोस्टातील बचत खातेदारांसाठी देशातील पहिलीच डिमॅट व ECS सुविधा उपलब्ध करणे, पोस्टमार्टेम मदत, अशा कितीतरी जीवनावश्यक गरजांची सोय-तरतूद त्यांनी आपला खासदार म्हणून केली. कामे तर त्यांनी प्रंचड केलेली आहेत. पण वाचकांच्या सोयीसाठी एका खिशात राहील अशी पुस्तिका प्रकाशित करण्याचा आमचा हा एक वेगळा प्रयास. त्यासाठी निवडक १०१ कामे जी लोकांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणार अशा कामांचा हा एक धावता आढावा.

***किरीट सोमैयांचा हा आढावा वाचल्यानंतर आपल्याला देखील वाटू लागेल की आपला हा खासदार ५ वर्षांनी एकदा दिसणारा खासदार नसून तो खरच आपला माणूस... आपल्यापैकी एक आहे.***

आपले

**आ.प्रमोद शिरवळकर** **आ.प्रकाश महेता**

**आ. लिलाधर डाके** **आ.सरदार तारासिंग**



# • नाहूर रेल्वे स्टेशन काम चालू आहे •

- ४० वर्षांत मुंबईत निर्माण होणारे पहिले नवे रेल्वे स्टशेन.
- मुलुंड-भांडूपमधील **३ लाख** नागरिकांना लाभ.
- रेल्वे प्रवाशांना आधिकाधिक चांगल्या सुविधा मिळाव्या म्हणून नाहूर रेल्वे स्टेशनचे स्वप्न साकार करण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- किरीट सोमैयांचा एकच ध्यास मध्य रेल्वेचा सुखद प्रवास.



नाहूर रेल भूमिपूजन करते हुए रेलमंत्री नितिशकुमार, पेट्रोलियममंत्री राम नाईक और अन्य मान्यवर



# • मोफत घर योजना •

- **१० हजार** लोकांना मोफत घरांची उपलब्धता.
- केंद्र सरकारच्या वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेचा मुलुंड, भांडूप, घाटकोपर, चेंबूर ईशान्य मुंबईत प्रारंभ.
- मुंबईसाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजना, निर्मल भारत योजनेसाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी **४९ कोटी** रुपये मिळविण्याचे महत्वपूर्ण काम.



वाल्मिकी आंबेडकर आवास योजनांअतर्गत गरीबों को मुफ्त घर की चाबीयां देते हुए

# • ५४०० एकर मिठागर जमीन •

- १९८५ पासूनचा रखडलेला प्रश्न सोडविला.
- २५ लाख लोकांचे पुनर्वसन
- ५४०० एकर मिठागराच्या जमिनीचा प्रश्न मार्गी लावण्याचे जिकरीचे कार्य.
- येत्या ५ वर्षात २००० एकर जमीन उपलब्ध होणार असून ५ लाख घरे बांधण्यात येतील म्हणजे २५ लाख लोकांना नवजीवन मिळेल



केंद्रीय मंत्रीमंडळ के साथ मिठागर जमीन का दौरा



# • कुर्ला ठाणे ५/६ वी रेल्वे लाईन •

- नवीन कोकण आणि कर्जत पनवेल गाडयामुळे मध्य रेल्वेवरील गाडयांची संख्या वाढली आहे.
- २० लाख प्रवासी वाहून नेणाऱ्या या मार्गावर नवीन रेल्वे लाईन.
- त्यानुसार कुर्ला ठाणे दरम्यान नवीन लाईन टाकण्याचा प्रकल्प कार्यान्वित झाला असून वेगाने काम सुरु आहे.



कुर्ला – थाने ५ वी और छटी रेल लाईन



# • घराघरात शौचालय •

- चाळीतील आपल्या बंधू-भगिनींना आता टमरेल घेऊन जाण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यासाठी घराघरात शौचालयाचा अनोखा उपक्रम.
- स्वच्छता आणि आरोग्य यांचे महत्व लक्षात घेऊन तशा सुविधा ईशान्य मुंबईतल्या अनेक चाळी आणि झोपडपट्ट्यांमध्ये दिल्या गेल्या.
- घराघरात शौचालय, निर्मल भारत शौचालय, अपना शौचालय खासदार निधीतून आणि सार्वजनिक शौचालय अशा योजना राबवून सुमारे **५२** वस्त्यांमध्ये **सव्वा दोन लाख** लोकांना शौचालयासारखी मूलभूत आणि आवश्यक सुविधा दिली आहे.



अपना शौचालय



# पवई तलावाचे शुद्धीकरण आणि सौंदर्यीकरण

- **१२५** वर्षे जुन्या आणि वैभव असलेल्या निसर्गरम्य पवईतलावाचे संरक्षण आणि सौंदर्यीकरण करण्याची योजना कार्यान्वित केली. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून **६.६२** कोटी रुपयांचा निधी मिळवून दिला.
- पवई तलावाला येऊन मिळणाऱ्या चार मोठे आणि छोटे नाले बंद करुन पाच मलनिस्सारण नाले दुसरीकडे वळविले गेले. पाण्याच्या शुद्धीकरणासाठी तलावामध्ये **२००** डिफ्युजर्स आणि **७** कॉप्रेसर्स बसविले गेले. आणि पवई तलावाची शुद्ध पाण्याची तहान भागविली गेली.



पवई तलाब में का एक डिफ्युजर

# • आरोग्य मेळे •

- गेल्या चार वर्षात मुंबईतील लोकांमधील आरोग्यविषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून खेल महोत्सवाप्रमाणे आरोग्य मेळाव्यांचे कल्पकता पूर्ण आयोजन केले गेले.
- **२ महाआरोग्य मेळे आणि १० छोटे आरोग्य मेळे. त्यात दीड लाख लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.**
- हजाराहून जास्त डॉक्टर्स २२ हॉस्पिटल आणि ५७ संस्थांनी आपले सहकार्य देऊ केले होते.



आरोग्य मेले में बच्चों को मुफ्त दवाईयां देते हुए वैद्यकीय सहाय्यक



# • छोटया गुंतवणूकदारांना संरक्षण •

- वेगवेगळया माध्यमातून छोटया गुंतवणूकदारांच्या फसवणुकीविरुद्ध व्यापक मोहीम.
- युनिट ६४ च्या गुंतवणूकदारांच्या हिताकरिता २००१ मध्ये लोकसभेत घणाघाती भाषण करुन छोटया गुंतवणूक दारांच्या हिताचे रक्षण करण्याचे सरकारला आवाहन आणि
- युटीआयच्या युनिट ६४ च्या १ कोटी ८२ लाख गुंतवणूकदारांना आर्थिक संरक्षण मिळवून देण्यात यश.




छोटे निवशेको के संरक्षण हेतू मिटींग सेबी चेअरमन जी.एन.बाजपेयी के साथ



# • कुर्ला-माहूल रेल्वे मार्ग •

- कुर्ला ते माहूल परिसरात वस्त्यांचे प्रमाण वाढले आहे. तिथल्या नागरिकांना रेल्वे प्रवासाची सुविधा व्हावी म्हणून किरीट सोमैया यांनी एक पिटीशन संसदेला सादर केले होते. त्यात चेंबूर वाशीनाका माहूल गवाणपाडा गावठाण आणि पांजरापोळ या भागातील रेल्वे प्रवाशासाठी रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी करुन दिली होती. त्याबाबत पूर्वी एक सर्व्हे झाल्याची आठवण करुन देण्यात आली होती. सोमैया यांच्या पिटीशनमुळे या मार्गाचा पुन्हा सर्व्हे होणार असून रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याची सुविधा वाढली आहे.



कुर्ला-माहूल रेल मार्ग के विषय मे रेल अधिकारी के चर्चा करते हुए मा. खासदार



# द्रोणाचार्य पुरस्कार
## शिक्षकांचे सन्मान

- समाज घडविण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान.
- **१० वर्षात ४० ठिकाणी** शिक्षक सन्मानाचे कार्यक्रम झाले.
- **३,५०० शिक्षक, प्राचार्य, मुख्याध्यापक** यांना द्रोणाचार्य पुरस्कार देऊन त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केला.




शिक्षको को द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करते हुए मा.गोपीनाथजी मुंडे

# विक्रांत म्युझियम-शहीदों को सलाम

## विक्रांत भंगार में नहीं जाने देंगें

- विक्रांत युद्ध संग्रहालयाचे स्वप्न साकार.
- केंद्र सरकारकडून **४० कोटी** व ONGC कडून **११ कोटी** निधी उपलब्ध करुन दिले.
- गेटवे ऑफ इंडिया समोर आशियातील पहिली **१४ मजली** भव्य विक्रांत म्युझियम.
- युवापिढीत देशभक्ती व सैन्यांचा सम्मान वाढविण्यासाठी एक अनोखा उपक्रम



हमारा विक्रांत : देश की शान – सेना का अभिमान



# • स्मॉल सेव्हिंग-अल्पबचत क्रांती •

- ईशान्य मुंबईतील दोन लाख अल्पबचत धारकांना मुंबईतील दहा लाख आणि देशातील चार कोटी ऐंशी लाख अल्पबचत धारकांना आपले मासिक उत्पन्न, परस्पर बँक खात्यात जमा करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टीमची सुविधा भारतात पहिल्यांदा निर्माण करुन दिली.
- पोस्टल सेव्हिंगज नॅशनल आणि डिमेट अकांऊंटचा पहिला प्रकल्प ईशान्य मुंबईत कार्यान्वित झाला. एवढेच नव्हे तर सामान्य गुंतवणूकदाराच्या हक्कांचे संरक्षण आणि त्याला अधिकार मिळवून देणाऱ्या कायद्याची निर्मिती



कें.मंत्री अरुण शौरी मुलुंड पोस्ट ऑफिस मे ECS नयी सुविधा का उद्घाटन करते हुए



# • गृहिणींना दिलास-पाईपलाईनद्वारे महानगर गॅस पुरवठा •

- मुंबईतील **५० हजार** घरांमध्ये पाईपलाईनद्वारा महानगर गॅस पुरवठा उपलब्ध करुन दिला.
- त्यामुळे **२ लाख ५० हजार** लोकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ.
- आता या **२,५०,००० लोकांना** स्वस्तात **२४ तास** आणि वर्षाचे **३६५ दिवस** स्वयंपाकाचा गॅस उपलब्ध.






# • मुलुंड बॉम्बस्फोट ग्रस्तांना मदत •

- १३ मार्च २००३ ला मुलुंड स्थानकात रेल्वे डब्यात झालेल्या बॉम्बस्फोटात मृत पावलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना केवळ **३ महिन्यात ४ लाख रुपयांचे** आर्थिक सहाय्य मिळवून दिले.
- इतक्या कमी वेळात आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे वैशिष्ट्यपूर्ण काम झाले.
- समाज विघातक वृत्तीच्या लोकांनाही चपराक बसली. संकटाच्या काळात लोकप्रतिनिधीही लोकशक्ती उभी करु शकतो हे दाखवून दिले.



मुलुंड बम स्फोटग्रस्तों को मदत प्रदान करते हुए
रेलराज्यमंत्री बंडारु दत्तात्रय और रेल वरिष्ठ अधिकारी

# केबल ग्राहकांसाठी लढा

- केबल ऑपरेटरांच्या मनमानी विरुद्ध आवाज उठविला.
- मुंबई उच्च न्यायालयानेही सोमैया यांनी केबल ग्राहकांच्या रक्षणाकरिता दाखल केलेल्या जनहित याचिकेल दाद दिली.



केबल ग्राहकों के हित में आवाज उठाया



# • मिठी नदी प्रदुषण •

- मुंबईत प्रदुषणाची समस्या एवढी वाढली आहे की विहार पवई तलावातून निर्माण होणारी मिठी नदी अर्ध्या वाटेतच बंद पडली होती. यामुळे पाण्याचा प्रवाह अडून पाणी तुंबण्याचे प्रकार मोठया प्रमाणावर होत होते.
- किरीट सोमैया यांनी ही बाब केंद्र व राज्य सरकारच्या लक्षात आणून दिली. एवढेच नव्हे तर टाटा कंपनीच्या तज्ञांमार्फत संशोधन व अभ्यास करुन ती प्रदुषण मुक्त करण्याची योजना सादर केली. परिणामी केंद्र सरकार आणि केंद्रीय प्रदुषण मंडळाने मिठी नदी प्रदुषण मुक्त करण्याचे आदेश मुंबई महापालिकेला दिले. मिठी नदी स्वच्छ करण्याचा आणखी एक लढा यशस्वी झाला.



केंद्रीय प्रदुषण मंडळ के साथ मिठी नदी के प्रदुषण का जायजा लिया



# • जनसुरक्षा परिवार विमा योजना •

- दररोज केवळ **१.५ रुपयाचा प्रिमियम भरुन ३०,००० रुपयापर्यंतची** आर्थिक मदत देणारी ही योजना सर्वाधिक लोकांपर्यत पोहचविण्याचे काम सोमैया यांनी केले.
- जीवनाच्या सुरक्षितेसाठी गरीब आणि मध्यमवर्गीयांना उपचाराकरिता योग्य वेळी पैशांची उपलब्धता करुन देणारी योजना



जनसुरक्षा विमा शुभारंभ - मा.स्वाथ्य्यमंत्री सुषमा स्वराज
और पॉलिसी वितरण करते समय नॅशनल इन्श्योरेन्स कंपनी के अधिकारी



# • पोस्टमार्टम सहायता •

- गेल्या अनेक वर्षापासून अपघाती मृत्यु झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता.
- संबंधित रुग्णालयाकडून दाखला मिळविण्यापासून ते प्रत्यक्ष प्रेत ताब्यात मिळण्यापर्यंत अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.
- त्याबाबत कोरोनर कोर्टच्या काळया कायद्यात सुधारणा घडवून आणण्याचे काम सोमैया यांनी केले आणि
- त्याबरोबरच आपल्या खासदार निधीतील **१० लाख रुपये खर्च** करुन घाटकोपर येथील पोस्टमार्टम केंद्रात सुधारणा घडवून आणली.

# • कनव्हेयंस ॲक्ट •

## घरमालकांचा हक्कासाठी लढा

- मुंबईतील **४०,००० सोसायटी** कनव्हेयंस शिवायचा आहे.
- घरमालकाच्या हक्कासाठी लढायचे हे किरीट सोमैया यांनी निर्धार केला आहे.
- एकदा सोसायटी रजिस्टर झाली की तीन वर्षाच्या आत जर बिल्डरने कनव्हेंयस नाही केला तर यांच्या संबंधीचे अधिकार शासनाने आपल्याकडे घ्यावेत असा आग्रहही त्यांनी केला आहे.



# हायवेवर अपघात टाळण्यासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम

- ईशान्य मुंबईत सर्वाधिक भुयारी मार्ग बांधून पादचाऱ्यांना दिलासा.
- छेडानगर, टागोरनगर, रमाबाईनगर, गोदरेज कॉलनी या ठिकाणी भुयारी मार्ग बांधले. नागरिकांना दिलासा अपघात कमी झाले.



लोगों की सुविधा के लिए भुयारी मार्ग का निर्माण



# • क्रांतीवीर श्यामजी कृष्णवर्मा •

- स्वातंत्र्य चळवळीमध्ये परदेशात राहून कार्य करणाऱ्या श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या अस्थी गेली ७३ वर्षे जिनिव्हामध्ये होत्या.
- सावरकारांचे गुरु असलेल्या वर्माच्या या अस्थी भारतात आणण्यासाठी सोमैया यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.



क्रांतीवीर श्यामजी कृष्णवर्मा जी के अस्थी का दर्शन लेते हुए गुजरात के मुख्यमंत्री मा. नरेंद्र मोदी, मा.मंत्री जयवंतीबेन महेता और अन्य मान्यवर



# • हिपेटायटीस बी मुक्त मुंबई •
# (कावीळ मुक्त मुंबई)

- **३०० रुपयांची** कावीळ/हिपेटायटीस बी ची लस फक्त २५ रुपयांत उपलब्ध करुन **४२,००० लसीकरण पूर्ण.**
- केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत पोलिओ लसीकरणाबरोबरच हिपेटायटिस बी च्या लसीकरणाचाही समावेश.



लसीकरण के लिए बच्चों की प्रचंड भीड

## • देशातील पहिल्या राष्ट्रीय एड्स परिषदेचे आयोजन •

- मुंबई महानगरात एड्सचा प्रसार वेगाने होत असल्याचे आढळून आले आहे.
- या गंभीर समस्येकडे सरकारचे उपापयोजना स्वयंसेवी संस्थांचे लक्ष वेधावे आणि देशभर परिणामकारक उपाययोजना आखता यावी म्हणून देशातल्या राष्ट्रीय एड्स परिषदेचे आयोजन करण्याची कल्पना सोमैया यांनी राबवली.






- त्यात ३२०० लोकांनी सहभाग घेतला. या दोन दिवसीय परिषदेत चार आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या शास्त्रज्ञांचे तीन धार्मिक नेत्यांचे मार्गदर्शन लाभले.
- **१२००** प्रतिनिधीसंह **२५० एड्स ॲक्टीव्हीस्ट** सहभागी झाले होते. तसेच **२० राज्य एड्स नियंत्रण संस्थांचे** प्रतिनिधी सहभागी झाले. एकूण **२० सत्र** या परिषदेत आखण्यात आली होती. अनेक तज्ञांनी सहभाग घेऊन महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.



राष्ट्रीय एड्स परिषद – प्रतिनिधीयों का अपूर्व प्रतिसाद

उद्घाटन समारोह



## • रेल्वे प्रवासी सुरक्षा अभियान •

### किरीट सोमैया का हर पल प्रयास
### सुखद हो मध्य रेल प्रवास

- प्रवाशांची काळजी घेणारा एकमेव खासदार.
- प्रवाशांना आपल्या प्राणाचे मोल लक्षात आणून दिले.
- २००२ ते २००३ वर्षात ५५१३ अपघांताची आकडेवारी दिली.






## • रमाबाई आंबेडकर नगराला सुविधा •

- रमाबाई आंबेडकर नगराला सर्वाधिक सुविधा देण्याचा सोमैया यांचा पुढकार.
- नवीन पोस्ट ऑफिस सुरु. अनेक दिवसांची मागणी पूर्ण.
- भुयारी मार्ग बांधून नागरिकांची सोय केली. पादचाऱ्यांना मोठा दिलासा.
- नागरी सुविधांसाठी खासदार निधीचा वापर.
- आरोग्य आणि स्वच्छतेला अग्रक्रम.

* * *

## • महिलांसाठी नियमित स्त्रीरोग उपचार शिबिर •

- महिला या महत्वाच्या घटकाकडे दूर्लक्ष होता कामा नये ही जाणीव मनात ठेवून ईशान्य मुंबईतल्या अनेक वस्त्यांमध्ये महिलांसाठी स्त्रीरोग चिकित्सा शिबिरे भरविली गेली.
- तज्ञ महिला डॉक्टर्सकडून जवळपास **१ लाख ५ हजार** महिलांची आरोग्य तपासणी करण्याचे उदिष्ट साध्य झाले.

* * *



## • प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन •

- नवीन कुर्ला ठाणे रेल्वे लाईन टाकताना रेल्वे रुळांच्या मध्ये येणाऱ्या नऊ कि.मी. अंतर झोपडयांनी अतिक्रमित केले होते.
- किरीट सोमैया यांच्या अथक परिश्रमानंतर २२०२ झोपडपट्टीवासियांना त्यांची पूर्ण काळजी घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात यश आले.
- कामाला गती यावी म्हणून त्यांनी सातत्याने संसदीय व्यासपीठावर चर्चा उपस्थित केली याशिवाय संसदीय याचिका, मंत्र्यांशी आणि अधिकाऱ्याकडे सतत पाठपुरावा यामुळे हे शक्य झाले.



ट्रॉझिंट कॅम्पो की प्रत्यक्ष मुलाकात



## • रेल्वे प्रवाश्यांना सुविधा •

- घाटकोपर ते मुलुंड स्टेशनच्या प्लॅटफॉर्मची उंची वाढवली
- नव्या तिकीट खिडक्या, प्लॅटफॉर्मवरील छप्पर, स्टेशन द्वार, पादचारी पूल इत्यादी
- मुलुंड ते कुर्ला व कुर्ला ते मानखूर्द या **१० स्टेशनकरिता ४८ कोटी रुपये खर्च.**

* * *



## • नवी आरक्षण केंद्रे •

- ईशान्य मुंबईतल्या रेल्वे प्रवाशांना बाहेरगावांची तिकिटे आरक्षण करण्यासाठी दादर किवा सीएसटी येथे जावे लागत होते. त्याच त्यांचा बराच वेळ आणि पैसेही खर्च होत असत.
- **परंतु आता चेंबूर, तुर्भे, घाटकोपर, कुर्ला नेहूरुनगर, भांडूप, विक्रोळी आणि मुलुंड या सहाही विधानसभा क्षेत्रातील नागरिकांना रेल्वे आरक्षण केंद्रांची सुविधा.**



## • मुंबईतील करदात्यांना रिफंड •

- मुंबईतील अनेक करदात्यांना रिफंड मिळाला नव्हता. अर्थ मंत्रालयाकडे पाठपुरावा करुन तीन महिन्यांच्या आत रिफंड मिळविण्याची तरतूद करवून दिली.
- विशेष म्हणजे मुंबईतील ५ लाख करदात्यांचा रिटर्न परस्पर त्यांच्या बँक खात्यात जमा होण्याचा ऐतिहासिक निर्णय केला.
- इंटरनेटने आयकर रिटर्न भरण्याचा पायलट प्रोजेक्ट बी ए आर सी मध्ये सुरु करुप आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करुन घेतला.

* * *



## • खेल महोत्सव •

- ईशान्य मुंबईच्या लोकांमध्ये आणि तरुण वर्गामध्ये खेळाचे महत्व पटवून देण्यासाठी खेल महोत्सव या अनोख्या उपक्रमाचे आयोजन केले गेले आणि
- आतापर्यंत भरवल्या गेलेल्या **१० खेल महोत्सवांमध्ये** एकूण **२५,००० संघ, ५०० सामाजिक मंडळे** आणि **५ लाखाहून** अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.
- या उपक्रमाची दखल घेऊन त्याची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदणी.





## स्मॉल सेव्हिंगचे आधुनिकीकरण-क्रांती

- डायरेक्ट बँक ट्रान्सफर, नॅशनल सेव्हिंगचे डिमेट, संपूर्ण संगणकीकरण. खातेधारकांना व्याजासाठी तासनतास रांगेत उभे राहण्याची गरज नाही.
- **मुंबईतील १० लाख बचत खातेदारांचा फायदा.**

## • नवीन पोस्ट ऑफिस व आधुनिकीकरण •

- रमाबाई नगर येथे ४० वर्षात प्रथम पोस्ट ऑफिस.
- ईशान्य मुंबईतील मुलुंड (पूर्व), मुलुंड(पूर्व-म्हाडा), हिरानंदानी गार्डन आणि भांडूप(प.)हनुमान नगर येथे नवीन पोस्ट ऑफिस उघडली गेली तर पंतनगर घाटकोपर(पूर्व), राजावाडी, टागोर नगर आणि एम.जी. रोड पोस्ट ऑफिस व नूतनीकरण केले.





## • महामार्ग-हरित मार्ग •

- रस्ते केवळ प्रवासासाठी असतात. असे नव्हे तर त्यांचा सांभाळही केला पाहिजे. वाहन प्रदूषणाचे प्रमाणही रोखता आले पाहिजे. आणि शहराचे सौंदर्यही टिकले पाहिजे. अशा तिहेरी उद्देशाने मुलुंड ते सायन दरम्यानच्या पूर्व द्रुतगती महामार्गावर अनोखी हरित क्रांती झाली.
- **३ लाख रोपं आणि १५ हजार झाडे** लावून या महामार्गाचे हरित मार्गात रुपांतर करणार. पहिला टप्पा पूर्ण.



मुलुंड से सायन के दरम्यान २१ किमी हायवेपर वृक्षारोपण करके हरितमार्ग बनाया

## • पवई, गांधीनगर पुलासाठी जमीन •

- नागरिकांच्या हिताला प्राधान्य देण्याचे धोरण असल्यामुळेच सोमैया यांनी पवई, गांधीनगर येथे पुलाच्या बांधकामासाठी सतत प्रयत्न करुन संरक्षण मंत्रालयाची जमीन मिळवून दिली आणि कामालाही गती दिली.

* * *

## • ईशान्य मुंबईत अधिक पेट्रोल पंप •

- कुर्ला ते मुलुंड या महामार्गावर हजारो वाहनांची ये जा चालू असते. तसेच एल.बी.एस. मार्गावरही वाहनांची वर्दळ असते. असे असूनही ईशान्य मुंबईत पेट्रोलपंपची संख्या खूपच कमी होती. कुर्ला ते मुलुंड या महामार्गावर एकही पेट्रोल पंप नव्हता. आता ही अडचण दूर झाली आहे.
- ईशान्य मुंबईला आता अधिक पेट्रोलपंप उपलब्ध झालेले आहेत.



## • सीएनजी स्टेशन •
## (कॉंप्रेसर नॅचरल गॅस)

- भविष्याची गरज ओळखून आणि प्रदुषण कमी करण्याच्या उद्देशाने मुंबईत अधिक सीएनजी स्टेशन उघडल्याने वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला.
- दूरदष्टी ठेवून उपाययोजना करण्याच्या सोमैया यांच्या प्रयत्नामुळेच ही सुविधा उपलब्ध झाली.

* * *

## • पूर्व द्रुतगती विस्तार •

- वाहनांची संख्या वाढत असूनही या महामार्गाच्या आणि दुरुस्तीच्या कामाकडे लक्ष देण्याची आवश्यकता होती. हे काम वेगाने व्हावे.
- लोकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी केंद्र सरकारकडून किरीट सोमैया यांनी १९ कोटींचा निधी मिळवून दिला.



## • आयआयटी पवईकरिता सुविधा •

- ईशान्य मुंबईतील गौरवशाली शिक्षण संस्था म्हणजे पवई येथील इंडियन इंन्स्टीटयूट ऑफ टेक्नोलॉजी.
- देशभरातील अनेक विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी येतात.
- या संस्थेला केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाकडून अधिक आर्थिक सुविधा मिळवून देण्यासाठी सोमैया यांनी पाठपुरावा केला.

* * *

## • झोपडपट्टी चाळवासियांचे रक्षण •

- केंद्र सरकारची जमीन असल्यामुळे तिथे राहणाऱ्या नागरिकांना नागरी सोयीसुविधा देण्यासाठी राज्य सरकार आणि महापालिका टाळाटाळ करीत असते. तर केंद्र सरकारकडूनही त्रास होत असतो.
- नित्यानंद घाटकोपरच्या केंद्र सरकारच्या जमीनीवरील झोपडपट्टी आणि चाळवासियांची ही समस्या किरीट सोमैया यांनी व्यक्तीगत लक्ष घालून जाणली आणि त्यांच्या हिताचे रक्षण केले.



## • कामगार हॉस्पिटलमध्ये
## हिपेटायटीस बी चे लसीकरण •

- सर्वांसाठी आरोग्य असे म्हणत असताना ते कामगारांसारख्या महत्वाच्या घटकापर्यंत उपलब्ध झाले पाहिजे हा दृष्टीकोन समोर ठेवून इएसआयएस सारख्या कामगार हॉस्पिटलमध्ये कावीळ-हिपेटायटीस बी च्या लसीकरणाची व्यवस्था सोमैया यांनी उपलब्ध करुन दिली.



## • कोकणासाठी अधिक गाडया •

- कोकणात रेल्वे पोहचल्यानंतर मुंबईतून कोकणात जाणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे.
- कोकणवासियांसाठी तर ते एक वरदानच ठरले असून गाडयांच्या संख्यामध्ये वाढ करण्याची गरज सोमैया यांनी ओळखली आणि त्याचा पाठपुरावा केला.
- आज मुंबईतून कोकणात जाण्यासाठी जवळपास ५ गाडया सुरु झाल्या आहेत.
- सोमैया यांच्या आग्रहानेच दादर-ठाणे या ठिकाणी उभ्या केल्या जातात.

### • जीवनरक्षक औषधांच्या अबकारीकरात कपात •

- औषधांच्या वाढत्या किमंती ही एक गंभीर समस्या झाली असून जीवनरक्षक औषधांच्या किमतीही सर्वसाधारण परवडणाऱ्या नव्हत्या.
- **२१ लाईफ सेविंग ड्रग्स वरुन कस्टम डयुटी काढून घेतली. त्यामुळे ही औषधे २०-२५ टक्के पर्यंत स्वस्त झाली.**



## • वीज ग्राहकांना न्याय •

- ईशान्य मुंबईतील बऱ्याच भागात महाराष्ट्र राज्य वीज मंडळातर्फे वीज पुरवठा केला जातो.
- वीज मंडळाच्या धरसोड वृत्तीमुळे अनेक वीज ग्राहकांना पूर्व सूचना न देता भरमसाठ बिल आकारण्याचे प्रकार घडले.
- हा अन्याय दूर करण्यासाठी सोमैया यांनी वीज मंडळ आणि वीज ग्राहकांमध्ये समन्वय निर्माण केला.



ग्राहकों के बिजली संबधी समस्योकां निराकरण करने के लिए जाहीर वार्तालाप



## • घाटकोपर गोळीबार रोड विस्तारीकरण •

- ईशान्य मुंबईत घाटकोपर विस्तारणारे उपनगर असल्यामुळे तिथल्या गोळीबार रोडच्या विस्तारीकरणाची आवश्यकता होती. याकरता लागणारी जमीन संरक्षण मंत्रालयाच्या ताब्यात असल्यामुळे ती मिळविण्यासाठी किरीट सोमैया यांनी जिद्दीने पाठपुरावा केला आणि १९,६०७ चौरस फुट जागा प्राप्त करण्यात यश मिळविले.

* * *

## • भांडूप गाव व विक्रोळी रेल्वे स्टेशनजवळील उड्डाण पूल •

- या दोन्ही स्टेशनजवळ उड्डाण पूल व्हावेत अशी दोन्ही स्टेशनची मागणी आहे. या कामांना मंजूरी मिळावी म्हणून महापालिका आणि एमएमआरडीए यांच्याशी संबंध साधून त्याला गती देण्याचे काम केले.



## • गुंतवणूकदारांचा मेळावा •

### INVESTORS MELA

- आर्थिक सुधारणांच्या युगात गुंतवणूक दार हा महत्वपूर्ण घटक असून त्याला मार्गदर्शन आणि त्यांच्या हिताचे रक्षण या बांबीना सोमैया यांनी प्राधान्य दिले होते.
- गुंतवणूकरदारांचा तपशीलासह मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने चर्चगेट, मुलुंड आणि घाटकोपर येथे गुंतवणूकदारांचा मेळावा आयोजित केला गेला होता.



इन्व्हेस्टर्स मेले का उद्घाटन करते हुए सेबी चेअरमेन श्री.बाजपेयी, आयसीआयसीआय बँक के श्री.कामत और अन्य मान्यवर व्यक्ती

- चर्चगेट येथील तीन दिवसीय गुंतवणूकदार मेळाव्यात ३२ तज्ज्ञांनी ८ सेमिनार मधून मार्गदर्शन केले त्यात सेबी पासून ते इन्श्योरन्स कंपन्यांचा सहभाग होता.
- चर्चगेट येथील तीन दिवसीय गुंतवणूकदार मेळाव्यात आपपल्या संस्थेची माहिती देणारे ११० स्टॉल्स हे या मेळाव्याचे वैशिष्टय तर होतेच शिवाय २२,५३० गुंतवणूकदारांचा प्रत्यक्ष सहभाग म्हणजे एक उच्चांकच होता. गुंतवणूकदारांसाठी भरविला गेलेला मुंबईतला पहिलाच मोठा मेळावा ठरला.





## • मुलुंड पूर्वेला नवे पोलिस स्टेशन •

- मुलुंड पूर्व भागात वाढत असलेली लोकवस्ती आणि भांडूप पूर्व रेल्वे स्टेशन, ऐरोली ब्रीज या परिसरातील लोकांना सुरक्षिततेचा नवा दिलासा मिळाला असून खासदार पूर्व येथे ५,००० स्क्वेअर जागेत नवीन पोलिस स्टेशन खासदार किरीट सोमैया यांच्या प्रयत्नाने कार्यान्वित झाले आहे. याकरता लागलेला सर्व निधी त्यांनी आपल्या खासदार निधीतून उपलब्ध करुन दिला. या पोलिस स्टेशनमध्ये ७६ कर्मचारी वर्ग असून त्यात एक सिनीयर पोलिस इन्स्पेक्टर एक असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर आणि चार पोलिस सबइन्स्पेक्टर उपलब्ध राहतील. महिला कॉन्स्टेबलसाठी वेगळी खोली असून कॉम्प्युटर रुमची सुविधा तेथे केली गेली आहे. एका कस्टडी रुमचेही बांधकाम त्यात करण्यात आले आहे.





## • जीवन आशा वैद्यकीय सहाय्य योजना •

- **गेल्या ४ वर्षात ३००० गरजूंना कन्सर, हार्ट, किडनी, ब्रेल इत्यादी शस्त्रक्रियेसाठी मदत.**
- अनेक रुग्णांना मोठया रोगावर उपचार करण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता असते. अशावेळी गरीब व मध्यमवर्गीय लोकांना पैसे जमविणे कठीण होते.
- ह्रदय शस्त्रक्रिया बायपास सर्जरी मूत्रपिंड व मज्जा संस्थांच्या विकारांवर मदत मिळवून देण्यासाठी ही योजना आहे. या वर्षी ३१ ऑगस्टपर्यंत ७३ रुग्णांना पंतप्रधान सहाय्य योजनेतून आर्थिक मदत मिळवून देण्यात आली.
- एवढया मोठया प्रमाणावर पंतप्रधान सहाय्यता निधीतून मदत मिळवून देणारे किरीट सोमैया हे एकमेव खासदार आहेत.



## • जागते रहो अभियान •

**रुकीये, सोचिये, समझदारी से इन्वेस्टमेंट कीजिये**

- अनेक वेळेला अनेक व्यक्ती भावनेच्या आहारी जाऊन गुंतवणूकीचा निर्णय घेते. लोकांमधील ही प्रवृत्ती लक्षात घेऊन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी ॲलर्ट इन्व्हेस्टर्स या प्रकारची मोहीम राबविली गेली. त्याअंतर्गत छोटया गुंतवणूकदारांचे राष्ट्रीय सम्मेलन भरवले गेले. त्याला १ हजार प्रतिनिधी उपस्थित होते.
- या अभियानातूनच अनेक मोठया कंपन्यांमधील हस्तांतरणाच्या प्रक्रियेला आक्षेप घेतला गेला. दुप्पट पैसे बनविण्याच्या योजना प्लॅटेशन स्कीम यामधील फसवेपणा लक्षात आणून दिला गेला आणि लाखो गुंतवणूकदारांना त्याचा लाभ झाला.
- गुंतवणूकदारांचे मार्गदर्शन प्रशिक्षण आणि संरक्षण अशी कामे या जागते रहो अभियानांर्गत राबविले गेले.

## • जनसंपर्क कार्यक्रम •

- लोक प्रतिनिधी आणि त्या मतदार संघातील लोकांचा नित्य संपर्क याला किरीट सोमैया यांनी प्राधान्य दिले. केवळ स्वतःच नव्हे तर गेल्या पाच वर्षात पाच केंद्रीय मंत्र्यांना आपल्या मतदार संघात आणून लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी भाग पाडले. या मोहिमेमुळे त्यांनी २ लाख लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधला.
- आपल्या मुलुंड येथील कार्यालयात ते दर शनिवार-रविवारी लोकांसाठी वेळ राखून ठेवतात. कार्यालयात येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी त्यांनी स्वतंत्र पुस्तिकाही प्रसिद्ध केली होती.



लोगों की समस्या, उनके विचार, मार्गदर्शन सुनते हुए मा.खासदार



## • बालिका पालक योजना •

- अनाथ मुलांचा प्रश्न एकीकडे गंभीर रुप धारण करत असतानाच मुंबईतल्या श्रद्धानंद महिलाश्रम आणि वात्सल्य ट्रस्ट या अनाथ बालकांची सेवा करणाऱ्या संस्थेला सोमैया यांनी मोठा दिलासा दिला. या संस्थांमधील शंभर अनाथ मुलींना उज्वल भवितव्य लाभावे म्हणून युवक प्रतिष्ठान त्यांचे पालकत्व स्वीकारण्याचा निर्णय घेतला. मानव सेवा हिच ईश्वर सेवा या उदात्त ध्येयाची प्रचिती आणून दिली.

* * *

## • पहिली गॅस शव दाहिनी •

- समस्येला वेगळ्या विचारातून सोडवण्याचा प्रयत्न सोमैया करीत असतात. मृत व्यक्तींचे शव दहन करताना प्रत्येकालाच तो खर्च परवडतोच असे नाही. हे लक्षात घेऊन सोमैया यांनी खासदार निधीतून २५ लाख रुपये खर्च करुन हिंदस्थानातील प्रथम गॅस शव दाहिनी मुलुंड पश्चिम येथे पहिली गॅस शव दाहिनी सुरु केली.



## • घाटकोपर-अंधेरी स्काय रेल्वे (आकाशगाडी) •

- वाहुतकीची कोंडी सोडवणारा प्रदुषण अपघात कमी करणारा हा स्काय बस प्रकल्प सर्वप्रथम अंधेरी-घाटकोपर दरम्यान सुरु करण्यासाठी सोमैया यांचा प्रयत्न सुरु आहे.
- एमयुटीपी-एमआरव्हीसी, अर्बन इन्फास्ट्रक्चर फंड यासाठी महाराष्ट्र आणि केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाशी समन्वय व निराकरण

* * *

## • कांजूरमार्ग पूर्व नवीन रस्ता •

- कांजूरमार्ग पूर्वेला गेली अनेक वर्षे प्रवाशांना स्टेशनवर येण्यासाठी कच्च्या रस्त्याचा वापर करावा लागत होता. पावसाळयात होणारा हा त्रास दूर करण्यासाठी सोमैया यांच्या प्रयत्नातून नवीन पक्का रस्ता बनविण्यात आला.



## • ऑपरेशन परिजात •

- रेल्वे स्टेशनचा परिसर म्हणजे अस्वच्छतेचे साम्राज्य असे त्याचे स्वरुप ठरुन गेले आहे. रेल्वे रुळांची जागा प्रतिर्विधीपासून ते कुजलेले अन्न पदार्थ टाकेपर्यत वापरली जाते.
- रेल्वे स्टेशनचा परिसर स्वच्छ आणि सुशोभित असावा म्हणून सोमैया यांनी कुर्ला ते ठाणे दरम्यानच्या १७.६ किमीच्या पट्टयात शोभिवंत झाडे लावण्याचा प्रयत्न राबविला.



मुलुंड से कुर्ला तक का रेल परिसर हराभरा किया

## • निरोगी बालक-निरोगी मुंबई बालकांची मोफत वैद्यकीय तपासणी •

• पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून ईशान्य मुंबईत १३५ ठिकाणी लहान मुलांचे आरोग्य तपासणी शिबिर तर ११ ठिकाणी महिला आरोग्य तपासणी शिबिर राबविले गेले.

* * *

## • मुंबईत मिसाईल प्रोटेक्शन सेंटर •

• मुंबईचे संरक्षण ही एक मोठी जबाबदारी असून त्याकरिता संरक्षण मंत्रालयाचे भरघोस सहाय्य आवश्यक होते. मुंबईत मिसाईल प्रोटेक्शन सेंटर असावे अशी अपेक्षा तंज्ञामार्फत व्यक्त झाली होती. त्यासाठी संरक्षण मंत्रालयाकडे पाठपुरावा करुन किरीट सोमैया यांनी वरळी येथील महापालिकेची जमीन मिळवून दिली.



## • झोपडपट्टीला सुविधा •

• केंद्र सरकारची जमीन असल्यामुळे तेथे अनेक वर्षापासून राहिलेल्या गरीब झोपडपट्टीवासियांना विमानतळ प्राधिकरणाकडून न्याय मिळत नव्हता. त्यांना मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाकडून सोमैया यांनी परवानगी मिळवून दिली.

* * *

## • कोल्ड स्टोरेजला मंजूरी •

• मुंबईसारख्या औद्योगिक नगरीमध्ये मालाची निर्यात करण्यापूर्वी तो माल ठेवण्यासाठी विमानतळाजवळ कोल्ड स्टोरेज नसावे ही गोष्ट सोमैया यांना खटकली होती. त्यांनी वाणिज्य मंत्रालय आणि कृषी मंत्रालय यांच्याकडे सतत पाठपुरावा करुन मुंबई विमानतळाजवळ १६ कोटी रुपयांचे कोल्ड स्टोरेज मंजूर करुन घेतले.



## • मुंबई विमानतळ झोपडपट्टी पुनर्वसन •

• मुंबई विमानतळ परिसरात असलेल्या झोपडट्टी धारकांना न्याय मिळवून देण्याचे काम अखेर सोमैया केले. विमानतळानजीकची ही जागा मोकळी करण्यासाठी १० हजार लोकांना बेघर व्हावे लागले असते. परंतु सोमैया यांनी केंद्र सरकारकडून २१ कोटींचे अनुदान मिळविले आणि १० हजार लोकांना २२५ फुटाचे मोफत घर मिळवून दिले.

* * *

## • मुंबई विमानतळाचा विकास •

• बदलत्या काळाबरोबर मुंबई विमानतळाचा विकास ही एक आवश्यक बाब ठरली होती. सोमैया यांनी केंद्र सरकारच्या विभागांशी संपर्क साधून विमानतळावर वेगवेगळया प्रकारच्या सोयी सुविधासांठी त्याचा विकास घडवून आणला आहे.



## • टेलिफोनधारकांना दिलासा •

• मुंबईच्या धावपळीच्या जीवनामध्ये टेलिफोनचे एक विशेष महत्व आहे. नवीन टेलिफोन देताना होणारा विलंब कमी करण्यात सोमैया यांना यश आले. एवढेच नव्हे तर डॉलफिन ट्रमकार्ड सारख्या नव्या योजना राबविताना ग्राहकांना त्रास होणार नाही याचीही दक्षता त्यांनी घेतली.

* * *

## • मध्य वैतरणा पाणी प्रकल्पासाठी प्रयत्न •

• मुंबई महानगरातील भविष्यातील पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी मध्य वैतरणा पाणी प्रकल्प सुरु करणे आवश्यक होते. याकरता महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाशी समन्वय साधून अनेक अडचणींचे निराकरण करण्याची आवश्यकता होती. या प्रश्नाचे महत्व लक्षात घेऊन किरीट सोमैया यांनी याठिकाणी जातीने लक्ष घातले.

## • जीवन आरोग्य मार्गदर्शन केंद्रे •

- आरोग्यविषयी गरीब जनतेला विश्वास पात्र मार्गदर्शनाची आवश्यकता असते हे काम प्रत्येकवेळी डॉक्टर करतीलच असे नाही. म्हणूनच ईशान्य मुंबईतील गरीबांसाठी १० ठिकाणी जीवन आरोग्य मार्गदर्शन केंद्रांची योजना आखण्यात आली आहे. त्या केंद्रातून औषधे आणि शस्त्रक्रियेसाठी मदत मिळू शकेल.



आरोग्य केंद्र का उद्घाटन करते हुए मुंबई महापालिका के आयुक्त मा. करुण श्रीवास्तव, युवक प्रतिष्ठान के ट्रस्टी नरेश चंदाराणा और अन्य मान्यवर



## भांडूपेश्वरकुंड तलाव सुशोभिकरण

- कोणत्याही परिसराची स्वच्छता ही त्या परिसरात असणाऱ्या नद्या नाले आणि तलावांवर अवलंबून असते. बऱ्याच वेळेला या नद्या नाल्यांचा वापर सांडपाणी किंवा कचरा टाकण्यासाठी आणि उत्सवाच्या काळात मूर्तीच्या विसर्जनासाठी केला जातो. हे थांबवून भांडूपेश्वर कुंड विसर्जन तलावाचे किरीट सोमैया यांनी निधीतील २५ लाख रुपये खर्च करुन सुशोभिकरण घडवून आणले. त्यामुळे आज या परिसरालाही एक नवे रुप प्राप्त झाले आहे.

* * *



## • प्रदुषण मुक्त चेंबूरसाठी प्रयत्न •

- चेंबूर भागात आर.सी.एफ., हिदूस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, बीएआरसी अशा अनेक कंपन्या असून त्याठिकाणी होणारे वायू प्रदुषण सर्वात जास्त आहे. तिथे होणाऱ्या वायू गळतीच्या घटना लक्षात घेऊन किरीट सोमैया यांनी या प्रश्नाकडे विशेष लक्ष घातले आणि संसदेत एक जनहित याचिका दाखल केली, यामुळे या गंभीर समस्येकडे या कंपन्यांचे लक्ष वेधले गेले असून प्रदुषण रोखण्याच्या उपाययोजना सुरु झाल्या आहेत.

* * *

## • महाराष्ट्र रेल्वे विकास मंडळ स्थापण्यात पुढाकार •

- मुंबईतील उपनगरी रेल्वे वाहतूक या शहराच्या रक्त वाहिन्या आहेत. त्यांना अधिकाधिक रेल्वे सुविधा मिळाव्यात आणि याकरता केंद्र आणि राज्यात समन्वय निर्माण व्हावा म्हणून महाराष्ट्र रेल्वे विकास महामंडळाची स्थापना करण्यात किरीट सोमैया यांनी भरीव काम केले.



## • खलाशी भविष्य निर्वाह निधी घोटाला •

- मुंबईतील खलाशांच्या भविष्य निर्वाह निधीत गैरव्यवहार करुन कष्टकरी खलाशांचे पैसे लुबाडण्याचे प्रयत्न झाले. ही तक्रार किरीट सोमैया यांच्याकडे येताच या खलाशांच्या भविष्य निर्वाह निधीच्या घोटाळयाचा पाठपुरावा त्यांनी केला आणि त्यांना न्याय मिळवून दिला.

* * *

## • महाराष्ट्रात सोलार वॉटर हिटर योजना •

- सौर उर्जेवर आधारित वॉटर हिटर योजना देशाच्या अनेक भागामध्ये यशस्वीपणे राबविली जात आहे. ही योजना महाराष्ट्रातही राबविली जावी आणि तिचा मोठया प्रमाणावर विकास व्हावा म्हणून सोमैया यांनी विशेष प्रयत्न केले. आज महाराष्ट्रात या योजनेचा श्रीगणेशा झाला आहे.

## • अदृष्य कंपन्याविरुद्ध मोहीम •

- बोगस नावे घेऊन आणि चुकीचे पत्ते देऊन सर्वसामान्य गुंतवणूकदारांकडून कोटयवधी रुपये उकळण्याची लाटच वर्षभरापुर्वी निर्माण अचानकपणे गायब होत असत. त्यामुळे कष्टाचे पैसे गुंतवलेला सर्वसामान्य माणूस रडकुंडीला येत असे. ही व्यथा लक्षात घेऊन सोमैया यांनी या अदृष्य म्हणजेच व्हॅनिशिंग कंपन्यांचा शोध घेतला आणि अशा किमान २०० कंपन्यांची नावे जाहीर केली. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांना बाध्य केले आणि गुंतवणुकदारांना न्याय मिळवून दिली.

* * *

## • डेक्कन ओडीसी महाराष्ट्र दर्शन •

- पंतप्रधानाच्या हस्ते उद्घाटन झालेल्या डेक्कन ओडीसी महाराष्ट्र दर्शन गाडीच्या योजनेत केंद्र आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात समन्वय घडवून आणण्याचे काम सोमैया यांनी सातत्याने केले आणि म्हणूनच या रेल्वेचा प्रकल्प आकारला येऊ शकता.



## • कांजूरमार्ग मरीन मॅनग्रो पॉर्क •

- भांडूप कांजूरमार्ग परिसरातील खाडीलगतच्या जलसंपत्तीचे संरक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. तेथील पाण्यामध्ये असलेल्या तिवरे या जल वनस्पतीचे संरक्षण करण्यासाठी मरीन ग्रो पार्क उभारण्याची कल्पना आकारला येत आहे. त्याकरिता श्री सोमैया पाठपुरावा करत आहेत.

## • लार्सन अँड टूब्रो •

- लार्सन अँड टूब्रोच्या छोटया गुंतवणूकदारांनासुद्धा दुप्पट पैसे मिळवून न्याय दिला.

### • रिचर्डसन क्रुडासच्या कामगारांना न्याय •

- भांडूप मुलुंड औद्योगिक खटल्यात प्रतिष्ठेची समजली जाणारी रिचर्डसन क्रुडास कंपनी व्यवस्थापनाच्या धोरणामुळे अडचणीत आली होती. आणि कामगारांना वाऱ्यावर सोडण्याचा कंपनीचा प्रयत्न होता. कंपनी बंद पडू नये कामगारांचा रोजगार चालू रहावा. अशा विविध मार्गांनी सोमैया यांनी राज्य आणि केंद्र सरकारकडे त्याचा पाठपुरावा केला आणि कामगारांवर येणारे संकट टाळले.



## • कच्छ भूंकप ग्रस्तांना मदत •

दोन वर्षापूर्वी आलेल्या प्रलयंकारी भूंकपात कच्छ परिसरात मोठया प्रमाणात मानवी आणि वित्त हानी झाली होती. सोमैया यांनी मुंबईत मोठया प्रमाणात निधी संकलित करुन आपत्ग्रस्तांच्या उपचारासाठी तातडीची उपाययोजना केली. त्यासाठी आपल्या कार्यालयात त्यांनी एक नियंत्रण कक्ष उभारला होता. कच्छ हेल्प लाईन नावाचा एक नियंत्रण कक्ष उभारला होता. सोमैया यांच्या प्रयत्याने शंभर जख्मींच्या उपचाराची व्यवस्था मुंबईत करण्यात आली होती.

* * *

## • खासदार निधींची यशस्वी वापर •

- आपल्या खासदार निधीचा पूर्ण आणि यशस्वी उपयोग सोमैया यांनी केला आहे. मुंबईतील सर्व खासदारांमध्ये ९१.८ टक्के खासदार निधी वापरुन त्यांनी उच्चांक प्रस्थापित केला होता. यावर्षात २४७ कोटींची ८२ कामे प्रस्थापित केली आहेत.



## • लोकसभेत मुंबई आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व •

- खासदार म्हणून किरीट सोमैया यांनी लोकसभेच्या सार्वभौम व्यासपीठावर सातत्याने महाराष्ट्र आणि मुंबईचे विषय मांडले आहेत. कोकण रेल्वेतील आर्थिक अडचणी मुंबईतील झोपडपट्टीवासियांना मूलभूत नागरी सुविधा देण्यासाठी प्रश्नोत्तरे आणि विशेष चर्चेच्या माध्यमातून पाठपुरावा.

* * *

### • महाराष्ट्रातील वीजेची समस्या सोडविण्याबाबत निवेदन करुन सरकारचे लक्ष वेधले •

- मुंबईच्या खासदारांचे शिष्टमंडळ घेऊन पंतप्रधानांबरोबर चर्चाही केली. जवानांच्या कुटुंबियांना सहायता मिळवून देण्यासाठी विषय उपस्थित केला. मुंबईमध्ये सर्व लोकल बारा डब्यांच्या कराव्यात म्हणून आग्रह धरला. मुंबई नागरी विकास परिवहन प्रकल्पासाठी पाठपुरावा केला. विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी सरकारला योजना सांगितली. मिठागरांच्या जमीनी मोकळया करण्यात यश मिळविले.

## • अर्थसंकल्पावर प्रभावी भाषण •

- आर्थिक विषयात सोमैयांचा विशेष अभ्यास.
- अर्थ संकल्पावर लोकसभेत प्रभावी भाषण.
- सर्वसामान्य जनतेच्या हिताचे मुद्दे मांडले.
- गरीबांसाठी आरोग्य ज्येष्ठांसाठी सुविधा.
- तरुणांसाठी रोजगार अशा मुद्दांची आक्रमक मांडणी.

* * *

## • वृद्धाश्रमांसाठी मदत •

- वृद्धाश्रम योजनेसाठी सोमैया यांचा विशेष प्रयत्न.
- वृद्धांचा सांभाळ हे सामाजिक कर्तव्य.
- महाराष्ट्रातील वृद्धाश्रमांना केंद्राचे अनुदान मिळवून दिले.

* * *



## • ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या •

- ज्येष्ठ नागरिकांविषयी सतत आदरभाव.
- ज्येष्ठांना ठेवीवर ज्यादा व्याज मिळवून देण्यात यशस्वी.
- प्रवासात भाडेसवलत मिळूवन दिली.
- आरक्षणाचीही सोय उपलब्धता करुन दिली.
- वृद्धांविषयीचा संस्कार जागविला.

* * *

## • मुंबई आणि मुलुंड भूषण •

- ज्याचे कर्तुत्व त्याचे कौतुक. नैपुण्य आणि कार्यक्षमता दाखविणाऱ्यांना मुंबई आणि मुलुंड भूषण देण्याची योजना. सर्वांना विकासात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न. आपला खासदार आपल्याबरोबर असल्याची भावना निर्माण केली गेली.

* * *



## • उत्सव प्रिय किरीट •

- जेथे उत्सव तिथे किरीट.
- जिथे समाज तिथे सोमैया.
- प्रत्येक उत्सवामध्ये सहभागी होऊन आपल्या खासदाराचे आपलेपण सिद्ध.
- उत्सवांचे निमित्त साधून सामाजिक जागृती घडविण्याचे काम.
- आपला खासदार सर्व उत्सवांमध्ये पुढाकार.





## • एलआयसी प्रिमियमवरील टॅक्स रद्द करण्याची मागणी •

- जीवन विमा सुविधेसाठी सोमैयांची नवी हमी.
- मध्यमवर्गीयाना एल आय सी वर सर्व्हिस टॅक्स नको या मागणीचा सर्व स्तरावर पाठपुरावा. लाखो लोकांच्या तक्रारीचे प्रतिनिधीत्व.

* * *

## • लोकोपयोगी कामांकडे बारीक लक्ष •

- आपला खासदार आपली कामे. छोटया कामातून हजारोंना दिलासा.
- दोन वर्षात तीन पोलिस चौक्या, १४ उद्यानाचे सुशोभिकरण.
- ५६ शौचालये, ९ समाजकल्याण केंद्रे,
- ६ व्यायामशाळा, २ बालवाडया, ५०० च्या वर कामे पूर्ण.

* * *

## • नागरी बँकातील ग्राहकांचे पैसे वाचविले •

- सहकाराला स्वाहाकार थांबवला. भ्रष्ट्राचारापासून सहकार क्षेत्र वाचविले. माधवपुरा बँक, रुपी बँक, लाभ को.ऑप. बँक आणि युनायटेड इंडिया वेस्टर्न बँकेतील खातेदारांचे पैसे मिळवून दिले.




**लाभ को.ऑप. बँके च्या अनेक खातेदारांना २१ दिवसात पैसे परत मिळवून दिले**



## • युटीआयची चौकशी •

- युटीआय विरुद्ध चौकशीची मागणी करणारे सोमैया पहिले खासदार.
- युटीआयच्या पुनर्रचनेचा पाठपुरावा केला.
- युनिट ६४ च्या गुंतवणूकदारांना न्याय मिळवून दिला.

* * *

## • ब्लड बँकांच्या सोयीसाठी प्रयत्न •

- आपल्या खासदाराचे मतदारांबरोबर रक्ताचे नाते.
- रक्तपुरवठा त्वरित करता यावा म्हणून अनेक प्रयत्न.
- ब्लड बँकांच्या सोयीसाठी १९१० हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन दिला. एक मोठी गरज पूर्ण झाली.

* * *



## • सर्वाधिक जनहित याचिका •

- सर्वाधिक जनहित याचिका दाखल करणारा खासदार.
- १३व्या लोकसभेत एकूण २७ याचिकांपैकी ८ याचिका सोमैयांच्या.
- याचिकांमुळे समस्यांची दखल घेतली गेली.
- चेंबूरमधील प्रदुषण कुर्ला माहूल रेल्वे, पवई तलाव या मुद्दांना याचिकमुळे प्राधान्य मिळाले.
- खासदार म्हणून सर्व वैधनिक मार्गांचा यशस्वी उपयोग.
- ११ खाजगी विधेयक मांडणारे सोमैया यांचा उच्चांक.

* * *



## • विविध समित्यांवर प्रतिनिधीत्व •

- सरकारकडे विविध समस्यांचा चौफेर पाठपुरावा. अभ्यास म्हणून वेगवेगळया समित्यांवर नियुक्ती.
- संयुक्त संसदीय समिती, भांडवल बाजार समिती आर्थिक स्थायी समिती, वाणिज्य स्थायी समिती, रेल्वे सल्लागार समिती, जनहित याचिका समिती, आणि पेटंट कमिटी अशा अधिकाधिक समित्यांवर त्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे.

* * *

## • अर्थसंकल्पावरील भाषणातील सातत्य •

- अर्थसंकल्पातून प्रकल्प मांडणारा खासदार.
- सर्वसामान्यांना अर्थ संकल्प समजावून देणारे लोकप्रतिनिधी.
- अचूक विश्लेषणामुळे अर्थ संकल्पावरील भाषणांचे स्वागत. गेली ६ वर्षे अर्थ संकल्पावर सातत्याने भाषण.

* * *

## • होम ट्रेड सीबीआय चौकशी मागणी •

- होम ट्रेड आणि को-ऑपरेटिव्ह बँकांतील गैरव्यवहार शोधून काढला.
- गुंतवणूकदारांचा अधिकार कायम ठेवला.
- सीबीआय चौकशीची मागणी करुन गैरव्यवहाराचे भांडे फोडले.

* * *

## •अंपगांसाठी शिबिर •

- अपंगांना आधार, सोमैयांचा नवा विचार.
- कृत्रिम अवयव उपलब्ध करुन अपंगांचे स्वप्न साकार.
- १०० अपंग व्यक्तींना मदतीचा हात दिला.

* * *



## • सेबीच्या समितीतून राजीनामा •

- सदस्यांचा सन्मान टिकवला.
- डिपॉझिटरी चार्जेसमध्ये वाढ करण्याचा निषेध.
- सेबीच एकतर्फी निर्णयाला आव्हाने दिले. त्या निषेधार्थ सेबीच्या समितीतून राजीनामा.
- अयोग्य निर्णयाना रोखणारा खासदार.

* * *

## • स्वातंत्र्य दिन, प्रजास्ताक दिनाचे उपक्रम •

- देशभक्तीला विनम्र अभिवादन. स्वातंत्र्यदिन प्रजासत्तकादिनी समाजोपयोगी उपक्रम. युवकांबरोबर सायकल शर्यतीत सहभाग. संपूर्ण मतदार संघात अधिकाधिक स्वांतत्र्यदिनांचे कार्यक्रम.

* * *



## • एड्सवरील औषध किमतीत कपात •

- एड्स रोगावर वेळच्यावेळी उपाय झाले तर त्याचा उपयोग होऊ शकतो. त्यावरची औषधे सर्वसामान्यांवरही कमी किमतीत उपलब्ध व्हावी म्हणून एड्सवरील औषधांचा दर ५,५०० रुपयांवरुन १२०० रुपयापर्यंत आणण्यात सोमैया यांना यश आले.
- ही औषधे ८०० रुपयांपर्यंत यावीत म्हणून जोरदार प्रयत्न करीत आहे.

* * *



## • सर्वोदय हॉस्पिटल आणि देवनार येथे केअर ॲंड सपोर्ट सेंटर •

- एड्स रुग्णांना प्रत्यक्ष त्याची माहिती देऊन त्याची काळजी कशी घ्यावी अशा मार्गदर्शनाचीही आवश्यकता होती.
- किरीट सोमैया यांनी घाटकोपर येथी सर्वोदय हॉस्पिटल आणि देवनार येथे एड्स केअर ॲंड सपोर्ट सेंटरसाठी दोन्ही संस्थांना केंद्र सरकारकडून १८ लाख रुपयांचे अनुदान मिळवून दिले.

* * *

## • बाबासाहेब आंबेडकर पुण्यस्मृतीस अभिवादन •

- समतेचा संदेश देण्याचे विविध उपक्रम राबविले.
- डॉ. बाबासाहेबांच्या पुण्यस्मृतीस अभिवादनाचे कार्यक्रम.
- समानतेचा संदेश पत्रकं वाटून घराघरात पोहचवला.

* * *



## • राष्ट्रगीताच्या सन्मानासाठी विधेयक •

- राष्ट्रगीताचा सन्मान राखण्यासाठी अभियान.
- राष्ट्रगीताचा होणार नाही अवमान राष्ट्रगीत म्हणताना काय काळजी घ्यावी हे सांगणारे विधेयक मांडले.
- या विधेयकातून राष्ट्रगीताचे महत्व पटवले.

* * *



## • कोकण विकास परिषद •

- कोकण हा निसर्ग संपन्न प्रदेश असून मुंबईत राहणाऱ्या कोकणी माणसाने आपल्या कोकणाचे संरक्षण करण्यासाठी पुढे यावे. तिथल्या जमीनी न विकता आधुनिक पद्धतीने शेती करावी पर्यटनाच्या उद्योगात सहभागी व्हावे. अशा उद्देशाने मुंबईतील कोकणी बांधवांनी कोकण विकास परिषदेचे आयोजन केले गेले. त्यात २५,००० पेक्षा जास्त बांधवांनी सहभाग घेतला.

* * *



## • तंबाखू सेवन विरोधी मोहीम •

- लोकांमधील व्यसनाधिनता कमी व्हावी आणि त्याचे दुष्परिणाम जाणवावेत म्हणून गेली चार वर्षे सातत्याने तंबाखू सेवन विरोधी मोहीम राबविली गेली.
- शिबिर चर्चा आणि पोस्टरच्या माध्यमातून लोकांना जागृत केले होते.

## • चेंबूर परिसरात प्रदुषणासंबधी संसदेत जनहित याचिका दाखल

### • पवई हिरानंदानी ते विक्रोळी - घाटकोपर जोडणारा नवीन बायपास रोड

### • कच्छ भूकंपग्रस्तांना त्वरीत मदत - पाघरंण्यासाठी वुलन शाल-डॉक्टर्स पाठविणे व आपल्या कार्यालयात नियंत्रण कक्ष उभारला

## • डेंग्यू प्रसार विरोधी मोहीम •

- वेगवेगळया रोगांच्या परिणामविषयी जनजागृती मोहीम हाती घेतली जात असतानाच मुंबईत डेंग्यू रोगाचा प्रसार होण्याची चिन्हे दिसताच किरीट सोमैया यांनी अत्यंत वेगाने लोकांमध्ये जनजागृती मोहीम राबविली.
- त्यात लोकांनी कोणकोणती खबरदारी घेतली पाहिजे याचे अत्यंत विस्तृत मार्गदर्शन केले गेले.
- योग्य वेळी उपचाराची माहिती मिळाल्याने मुंबईतील डेंग्यू प्रसार मोठया प्रमाणावर रोखला गेला.

* * *